DAY — 08 SEAT NUMBER

| 2022 | III | 12 | 1500 | J-757 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# POLITICAL SCIENCE (42)

Time : 3 Hrs. (4 Pages) Max. Marks : 80

सूचना : (१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(२) उजवीकडे दिलेल्या संख्या पूर्ण गुण दर्शवितात.

(३) प्रत्येक नव्या प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पानावर करावा.

प्र. १. (अ) कंसातील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : (५) [२०]

(१) बर्लिनची भिंत ---------- साली पाडण्यात आली.
(१९९०, १९८९, २००५, १९९५)

(२) सन १९७६ मध्ये संयुक्त राष्ट्रांचे ---------- साठीचे दशक सुरू झाले.
(स्वास्थ्य, महिला, शांती, बालक)

(३) दहशतवादी संघटना अमूर्त ---------- विचारसरणीने प्रेरित झालेल्या असतात.
(लोकशाही, धार्मिक, समाजवादी, उदारमतवादी)

(४) तंत्रज्ञानातील सर्वात महत्त्वाची क्रांती हो ---------- क्रांती होय.
(फेसबुक, व्हॉट्सअॅप, इन्स्टाग्राम, इंटरनेट)

(५) भारतात २००५ पासून ---------- हा प्रसिद्ध कायदा लागू करण्यात आला.
(शिक्षणाचा अधिकार, माहितीचा अधिकार, लोकपाल आणि लोकायुक्त कायदा, ग्राहक संरक्षण कायदा)

(ब) खालील प्रत्येक गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा : (३)

(१) (अ) WTO — जागतिक व्यापार संघटना
(ब) GATT — आंतरराष्ट्रीय व्यापार नियम
(क) NGO — मानवी हक्कांची जपणूक

0757



P.T.O.

Previous Pathshala

(२) (अ) जंगलतोड — तापमानात घट

(ब) हरितगृहवायू — प्रदूषण

(क) दुष्काळी परिस्थिती — पाण्याची कमतरता

(३) (अ) अलिप्ततावाद — भारतीय परराष्ट्र धोरण

(ब) ब्रम्हदेश — सिलोन

(क) सीमावाद — भारत व चीन

**(क)** दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा : (४)

(१) १९८९ नंतर आंतरराष्ट्रीय संबंधामधील महत्त्वाचा प्रवाह ......

(अ) द्वि ध्रुवीयतेचा अस्त

(ब) आशियामध्ये प्रादेशिकतावादाचा उदय

(क) अलिप्ततावादाचा अंत

(२) भारताने नदी पाणी वाट्याबाबत फराक्का करार ......

(अ) बांगला देश या देशाबरोबर केला

(ब) पाकिस्तान या देशाबरोबर केला

(क) नेपाळ या देशाबरोबर केला

(३) भांडवलशाही अर्थव्यवस्था ही संकल्पना ......

(अ) भारतासाठी वापरली जाते

(ब) चीनसाठी वापरली जाते

(क) अमेरिकेसाठी वापरली जाते

(४) आज भारताचा लिंगभाव निगडित दृष्टिकोन ......

(अ) शिक्षणावर लक्ष केंद्रित करतो

(ब) विकासावर लक्ष केंद्रित करतो

(क) सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित करतो

**(ड)** दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा : (४)

(१) अनेक देशात कार्यरत असलेली कंपनी.

(२) जगातील इतर देशांशी संबंध स्थापम करून ते वाढविण्याचे धोरण.

(३) समाजात भीती निर्माण करून राजकीय आणि वैचारिक उद्दिष्ट्ये पूर्ण करण्याच्या हेतुने चालविलेला हिंसाचार.

(४) एखाद्या व्यक्तीची, कुटुंबाची किंवा समाजाची अशी स्थिती जिथे लोकांना स्वत:च्या मूलभूत गरजा भागविणे शक्य नसते किंवा कठीण असते.

**(इ)** गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा : (४)

(१) नेपाळ, भूतान, भारत, जर्मनी.

(२) भाषावाद, प्रादेशिकवाद, राष्ट्रवाद, जमातवाद.




Previous Pathshala

(३) शांतता, आर्थिक विकास अस्थिरता, लोककल्याण

(४) एक ध्रुवीयता, द्वि ध्रुवीयता, जागतिकीकरण, बहु ध्रुवीयता.

प्र. २. (अ) खालील संकल्पना चित्र पूर्ण करा :




(ब) खालील नकाशाचे निरीक्षण करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा : (५)




सोव्हिएट रशियामधील पूर्वीचे देश

सोव्हिएट रशियाच्या विघटनातून अस्तित्वात आलेल्या कोणत्याही पाच नवीन राष्ट्रांची, नावे लिहा.

प्र. ३. खालील विधाने 'बरोबर' की 'चूक' ते सकारण सांगा (कोणतेही पाच) :

(१) १९८० च्या दशकाला 'मानवतावादी हस्तक्षेपाचा' सुवर्णकाळ म्हणतात.

(२) राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना महिलाहक्क संरक्षणासाठी करण्यात आली.

(३) जागतिकीकरणात बिगर सरकारी संस्थांचे महत्त्व कमी झाले आहे.

(४) भारताच्या आर्थिक व्यवस्थेचे आधुनिकीकरण म्हणजे औद्योगिकीकरण होय.

(५) चारू मुजुमदार हे खलीस्थान चळवळीशी निगडित आहेत.

(६) राजकीय कार्यकारी प्रमुखाविरोधात लोकायुक्त चौकशी करू शकतात.

(७) 'सागरमाला' या योजनेत रस्त्यांचा व्यापक विकास अभिप्रेत आहे.

P.T.O.


Previous Pathshala

प्र. ४. खालील विधानांचा सहसंबंध स्पष्ट करा ( कोणतेही तीन ) : |९|

(१) हार्ड पॉवर आणि सॉफ्ट पॉवर

(२) जागतिकीकरण आणि संस्कृती

(३) महिला सक्षमीकरण आणि शाश्वत विकास

(४) राष्ट्रीय एकता आणि प्रादेशिक अस्मिता

(५) सुशासन आणि ई-प्रशासन

प्र. ५. खालील विषयावर तुमचे मत २५ ते ३० शब्दांत मांडा ( कोणतेही तीन ) : |१२|

(१) शांतता रक्षण हे संयुक्त राष्ट्राचे प्रमुख कार्य आहे.

(२) प्रदूषण रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजनेची गरज आहे.

(३) राष्ट्राच्या प्रगतीसाठी शांतता व स्थैर्य याची गरज आहे.

(४) माहितीचा अधिकार हा लोकशाही बळकट करण्यास महत्त्वाचा ठरतो.

(५) भारत आणि चीन संबंधाचे स्वरूप गुंतागुंतीचे आहे.

प्र. ६. खालील प्रश्नांची उत्तरे ८० ते १०० शब्दांत लिहा ( कोणतेही दोन ) : |१०|

(१) पर्यावरणाशी संबंधित महत्त्वाच्या समस्यांची चर्चा करा.

(२) आर्थिक प्रगती आणि समाज परिवर्तन ही उद्दिष्ट्ये पूर्ण करण्याकरिता राज्याची भूमिका स्पष्ट करा.

(३) सुशासनाच्या कोणत्याही पाच मूल्यांची माहिती लिहा.

(४) समाजातील विविध घटकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी असलेल्या विविध आयोगांची माहिती लिहा.

प्र. ७. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सुमारे १५० ते २०० शब्दांत स्पष्ट करा : |१०|

(१) जागतिकीकरणाच्या संदर्भात राजकीय घटकांवर लक्ष केंद्रित करणारे खालील मुद्दे स्पष्ट करा :

(अ) जागतिकीकरणाचा अर्थ

(ब) लोकशाहीचे महत्त्व

(क) राज्याचे स्थान

(ड) बिगर राजकीय घटक

(इ) मानवी हक्क

(२) भारताच्या परराष्ट्र धोरणाला प्रभावित करणारे घटक खालील मुद्द्यांच्या आधारे सविस्तर लिहा :

(अ) भौगोलिक घटक

(ब) ऐतिहासिक घटक

(क) आर्थिक घटक

(ड) राजकीय घटक

(इ) आंतरराष्ट्रीय व्यवस्था

◆◆◆

Previous Pathshala